महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ 17 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 259 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# उद्योजकांची ठाणे जिल्ह्याला पसंती

## कोकण विभागात साडेआठ हजार कोटींची गुंतवणूक

**जिल्हावार उद्योगांमधील गुंतवणूक आणि रोजगार**

ठाणे: 65 उद्योग,
गुंतवणूक – 4 हजार 783 कोटी,
रोजगार – 64 हजार 082

पालघर: 138 उद्योग,
गुंतवणूक – 1 हजार 492 कोटी,
रोजगार – 4 हजार 777

रायगड: 33 उद्योग,
गुंतवणूक – 931.5 कोटी,
रोजगार – 1 हजार 647

रत्नागिरी: 52 उद्योग,
गुंतवणूक – 936.25 कोटी,
रोजगार – 1 हजार 125

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** उद्योग वाढींसाठी आणि नव्याने रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अत्यंत महत्वाची असलेली कोकण विभागीय गुंतवणुक परिषद नुकतीच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या परिषदेच्या माध्यमातून तब्बल ८ हजार ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले असून याद्वारे ७२ हजार रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तर यामध्ये उद्योजकांकडून ठाणे जिल्ह्याला पसंती देण्यात आली असून



४ हजार कोटींची गुंतवणूक ही एकट्या ठाणे जिल्ह्यात करण्यात आली आहे.

कोकण विभागातील विविध जिल्ह्यांना केंद्रस्थानी ठेऊन गुंतवणूक आकर्षित करणे, गुंतवणूकदार तसेच व्यावसायिकांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, विभागातील प्रत्येक जिल्ह्याला अधिकाधिक निर्यातक्षम बनविण्यासाठी उद्योग संचालनालय, मुंबई अंतर्गत व उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियोजन भवन येथे "कोकण विभागीय गुंतवणूक परिषद" आयोजित करण्यात आली होती. या गुंतवणूक परिषदेचे उद्घाटन कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेच्या माध्यमातून विभागामध्ये ८ हजार ५०० कोटी इतकी गुंतवणूक होणार असून त्या माध्यमातून ७२ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत.

कोकण विभाग हा भौगोलिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असून नवीन गुंतवणुकीसाठी अनुकूल आहे. राज्यात पायाभूत सोयी सुविधा, समृध्दी महामार्ग, वाढवण बंदर निर्मिती यामुळे निर्यातीस प्रोत्साहन मिळत असून भविष्यात कोकण लॉजिस्टिक्स व शिपिंग हब म्हणून उदयास येईल.असे मत यावेळी विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

या परिषदेच्या अनुषंगाने कोकण विभागात एकूण ३३१ नामांकित उद्योग घटकांनी शासनासोबत सामंजस्य करार केले. या सामंजस्य करारान्वये कोकण विभागात ८ हजार ५०० कोटी इतकी गुंतवणूक होणार असून त्यामध्ये ७२ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. या परिषदेमध्ये झालेल्या सामंजस्य करारांपैकी काही उद्योगांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात सामंजस्य कराराचे वाटप करण्यात आले.

थोडक्यात महत्वाचे

## सरस' महामेळयाला पाच हजाराहून अधिक नागरिकांची भेट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी, या उद्देशाने कोकण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विभागीय, जिल्हास्तरीय आणि मिनी सरस विक्री प्रदर्शना आज शेवटचा दिवस आहे. या प्रदर्शनाला मागील चार दिवसात ५ हजाराहून अधिक नागरिकांनी भेट दिली.

या सरस महामेळयाचे वैशिष्ट्ये म्हणजे यात वैविध्य पाहायला मिळते. हस्तकला, वस्त्रोद्योग,घरगुती वस्तू, मसाले, लोणची, पापड, आणि अनेक पारंपरिक पदार्थांचे या ठिकाणी स्टॉल्स उपलब्ध आहेत. यामध्ये १४ खाद्यपदार्थांचे स्टॉल्स तर, हस्तकला, वस्त्रोद्योग घरगुती वस्तू, मसाले, लोणची, पापड, आणि अनेक पारंपरिक पदार्थांचे १६९ स्टॉल्स असे एकूण १८३ स्टॉल्स उपलब्ध आहेत. ठाण्यातील गावदेवी मैदान येथे भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाचा आज शेवटचा दिवस असून आज रात्री १० वाजेपर्यंत हे प्रदर्शन खुले असणार आहे. या प्रदर्शनात बचत गटाच्या महिलांनी स्वतः तयार केलेल्या दर्जेदार वस्तूं विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासाला हातभार लागत असल्याचे दिसत आहे. या प्रदर्शनात ठाणे जिल्ह्यासह कोकण विभागातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच इतर जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तू आणि खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. महिलांच्या कर्तृत्वाला आणि मेहनतीला सलाम करण्यासाठी सरसच्या माध्यमातून जिल्ह्यातील बचत गटांना त्यांची उत्पादने दाखविण्याची आणि उत्पादनांच्या विक्रीची संधी उपलब्ध होत आहे. या प्रदर्शनाला मागील चार दिवसात पाच हजाराहून अधिक नागरिकांनी भेट दिली असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये सर्वाधिक नागरिक खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सना भेट देत आहेत. तर, होळी आणि धुळवडच्या दिवशी सुद्धा या सरस च्या प्रदर्शनाला नागरिकांची गर्दी झाली होती.

## रामबाग शिवसेनेच्या चित्ररथास नोटीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - सोमवारच्या शिवजयंतीनिमित्त कल्याण पश्चिमेतील रामबाग शिवसेना शाखेने सामाजिक, जातीय तेढ निर्माण होईल असा चित्ररथ तयार केला असल्याचा आक्षेप घेत शिवजयंती मिरवणूक कल्याण शहरातून शांततेत पार पडावी म्हणून येथील महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांनी रामबाग शिवसेना शाखेचे भागवत बैसाने यांना प्रतिबंधात्मक नोटीस बजावली आहे. रामबाग शिवसेना शाखेने उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख विजय उर्फ बंड्या साळवी यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यांचा समाचार घेणारा आणि संभाजी महाराज यांना आपल्याच लोकांमधील गद्दारीमुळे पकडले गेले असल्याचा देखावा चित्ररथावर चितारला आहे. यामध्ये संभाजी महाराजांबरोबर आपल्याच लोकांनी गद्दारी केली नसती तर आज भारत नव्हे जगाचा इतिहास वेगळा असता, अशी वक्तव्ये लिहिण्यात आली आहेत.

या चित्ररथावर संभाजी महाराज औरंगजेबाला धडा शिकवतानाचा देखावा आहे. हा चित्ररथ सोमवारच्या कल्याणमधील सार्वजनिक शिवजयंती मिरवणुकीत दाखल करण्यासाठी रामबाग शिवसेना शाखा सज्ज झाली होती. दोन दिवसांपासून पोलिसांनी रामबाग शिवसेना शाखेचे सर्वेसर्वा बंड्या साळवी यांना संबंधित चित्ररथ सामाजिक, जातीय तेढ निर्माण करणारा असल्याने तो मिरवणुकीत प्रदर्शित करू नये, अशी गळ घातली आहे. आपण फक्त वास्तव परिस्थितीचे दर्शन या चित्ररथावरील देखाव्यातून घडविले आहे. यात आक्षेपार्ह काही नाही, असे जिल्हाप्रमुख बंड्या साळवी यांनी पोलिसांना सांगितले आहे. हा चित्ररथ शिवजयंती मिरवणुकीत सहभागी व्हावा यासाठी रामबाग शिवसेना शाखा आग्रही आहे. या सगळया पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक साबळे यांनी रामबाग शिवसेना शाखेचे भागवत बैसाने यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, प्रतिबंधात्मक आदेशाची नोटीस बजावली आहे.

## कल्याणमधील काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा शिंदेसेनेत प्रवेश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याणमधील काँग्रेसचे प्रदेश नेते आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्या उपस्थितीत शिंदे शिवसेनेत प्रवेश केला. कल्याण जिल्हा काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण, ठराविक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनाच मानाची पदे देण्याची स्पर्धा या कुरघोडीच्या राजकारणाला कंटाळून आम्ही शिंदे शिवसेनेत प्रवेश केला आहे, असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य पॉली जेकब यांनी सांगितले. मागील २० वर्षापासून आम्ही कल्याण जिल्हा काँग्रेस समितीमध्ये निष्ठेने सक्रिय पध्दतीने काम करत आहोत. पक्षाच्या आदेशाप्रमाणे आम्ही वेळोवेळी काँग्रेस पक्षासाठी, काँग्रेसचे उमेदवार निवडून आणण्यासाठी काम केले. पक्षाचे मोर्चे, आंदोलनात सहभाग घेतला. आम्हाला कधीही स्थानिक नेतृत्वाने मानाची पदे दिली नाहीत.

स्थानिक पदाधिकाऱ्यांभोवती रुंजी घालणाऱ्यांना पालिकेत समित्या, स्थायी समिती पदी वर्णी लावली. हे राजकारण संपणे कठीण आहे. आता तर कल्याण जिल्हा काँग्रेस समितीत कोणालाही दाद दिली जात नाही. एककल्ली स्थानिक कारभार चालविला जात आहे. या कारभाराला कंटाळून आम्ही शिंदे शिवसेनेत प्रवेश केला आहे, असे प्रदेश काँग्रेस नेते पॉली जेकब यांनी सांगितले.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांनी कल्याण जिल्हा काँग्रेस नेत्यांना मुंबईतील कार्यक्रमात शिवसेनेत प्रवेश दिला. खासदार शिंदे यांनी प्रत्येकाच्या हाती शिवसेनेचा झेंडा देऊन त्यांचे स्वागत केले आणि प्रवेश केलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याची कदर केली जाईल, त्यांचा योग्य सन्मान राखला जाईल, असे आश्वासन दिले.

प्रदेश नेते पॉली जेकब यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मानवी हक्क आयोग कल्याण विभागाचे अध्यक्ष राजकुमार हिरावत, विद्यार्थी विभागाचे सन्नी अॅन्थोनी, महासचिव सुनील चव्हाण, सल्लागार अॅड. नित्यानंद नायर, युवक काँग्रेस महासचिव संतोष शर्मा, प्रदेश काँग्रेस राष्ट्रीय मानवी हक्क आयोग प्रदेश सचिव स्टिफन हिवाळे, विजू अब्राहम अशा शेकडो पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शिंदे शिवसेनेत प्रवेश केला. येत्या पालिका निवडणुकीत आम्ही आमची ताकद दाखवून देऊ, असे पॉली जेकब यांनी सांगितले.

## डोंबिवली घारडा सर्कल येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आज लोकार्पण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली विभागातील घारडा सर्कल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे लोकार्पण सोमवार दिनांक 17 मार्च 2025 रोजी सायंकाळी 7.00 वाजता महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत होत आहे . हा भव्य पुतळा उभारण्यासाठी महापालिका क्षेत्रातील मुलभुत सोयीसुविधांच्या विकासासाठी तरतूद याअंतर्गत निधी मंजूर झाला असून, याबाबतचा प्रशासकिय ठराव सप्टेंबर 2024 मध्ये मंजूर झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा 12 फुटी अश्वारूढ पुतळा घारडा सर्कलच्या मध्यवर्ती भागात बसविला जाणार असून, आजू बाजूच्या परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे.

## सिडकोच्या कारभारावर संताप

### विजेत्यांना कमी क्षेत्रफळाची घरे !

### आमदार संदीप नाईक यांचा सिडकोला खरबरदारीचा इशारा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नवी मुंबईत सिडकोच्या घरांच्या किंमतीवरून सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचा सूर असतानाच आता सिडकोच्या घराचे क्षेत्रफळ कमी असल्याच्या तक्रारी आता पुढे येऊ लागल्या आहेत. जाहीरातीमध्ये ३२२ चौ. फूट क्षेत्रफळ इतकी सदनिका दर्शविली होती. परंतु आता विजेत्यांना २९१. ९२ चौ. फूट इतकीच सदनिका विजेत्यांच्या इरादा पत्रात नमूद आहे. त्यामुळे सिडकोच्या कारभाराविषयी संताप व्यक्त होत आहे. या प्रकारानंतर वन मंत्री गणेश नाईक यांचे पुत्र तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते माजी आमदार संदीप नाईक यांनी सिडकोला खरबरदारीचा इशारा दिला आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांनाही पत्रव्यवहार केला आहे. सिडको सोडतीतील विजेत्यांना जाहीर केल्याप्रमाणेच सदनिकाच द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

नवी मुंबईत घर घेता यावे यासाठी अनेकांनी सिडकोच्या २०२४ मध्ये निघालेल्या 'माझे पसंतीचे घर' सोडतीमध्ये अर्ज केला होता. परंतु या सोडतीमध्ये अनेक घरांच्या किमंती या अवाक्याबाहेर होत्या. त्यामुळे नागरिकांमध्ये या सोडती विषयी नाराजी होती. घराच्या किमंती वाढलेल्या असतानाच, आता सिडकोने जाहीरातीत दिलेल्या चटई क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाची घरे उपलब्ध करुन दिल्याचे समोर येत आहे. या बाबत आता सिडको सोडतीतील विजेत्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. सिडकोने सोडतीपूर्वी दर्शविलेल्या जाहिरातीमध्ये वाशी येथील एक 'बीएचके' घरांचे चटई क्षेत्रफळ ३२२ चौ.फूट दर्शविले होते. परंतु लेटर ऑफ इंटेन्ट अर्थात इरादा पत्रात घऱांचे क्षेत्रफळ २९१.९२ चौ. फूट इतकेच दर्शविले आहे.

या प्रकाराविषयी विजेत्यांकडून संताप व्यक्त होत आहे. वन मंत्री गणेश नाईक यांचे पुत्र तथा शरद पवार गटाचे नेते माजी आमदार संदीप नाईक यांनी याविषयी सिडकोला इशारा दिला आहे.

## उद्या सादर होणार ठाणे जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा परिषदेचा सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प मंगळवार, १८ मार्च रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे सादर करणार आहेत. शासनाकडून मिळणारे ५० ते ६० कोटी रुपयांचे अनुदान मिळाले नसल्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात घट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. परंतु, दुसरीकडे यंदाच्या अर्थसंकल्पात विविध नाविन्यपूर्ण योजनांसह आरोग्य आणि शिक्षण विभागावर भर देण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेच्या मार्फत करण्यात येत असल्याची सूत्रांची माहिती आहे.




ठाणे जिल्हा परिषदेच्या सदस्यांची मुदत ही १४ जानेवारी २०२३ रोजी संपुष्टात आली. तेव्हापासून जिल्हा परिषदेचा कारभार प्रशासकीय राजवटीखाली सुरु आहे. त्यामुळे मागील २ वर्षापासून ठाणे जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प प्रशासन सादर करत आहे. ठाणे जिल्हा परिषदेचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा १०४ कोटी ६६ लाख रुपयांचा अर्थसंकल्प तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी सादर केला होता. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची देखभाल आणि दुरुस्ती, मागासवर्गीय लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे गट पुरवठा, अतितीव्र अपंगाच्या पालकांना एकवेळ अर्थसहाय्य अशा नव्या योजनांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्प किती कोटींचा असेल त्यात, कोणत्या विभागांवर सर्वाधिक भर दिला जाईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यंदाच्या अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील दिव्यांग बांधवांसाठी सुगाम्य भारत, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ई – संजीवनी, कंटेनर अंगणवाडी यांसह नाविन्यपूर्ण योजनांचा समावेश असून शिक्षण आणि आरोग्य विभागावर विशेष भर दिला जाणार असल्याची शक्यता आहे. यंदाचा जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक असेल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी सांगितले.



## वाचक मनोगत

# कोकाटेंच्या पुढे पर्याय काय ?

बनावट कागदपत्रे सादर करून शासकीय सदनिका मिळविल्याप्रकरणी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावल्याने, लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची आमदारकी आपोआपच रद्द झाली. मंत्रिपद आणि आमदारकी वाचविण्यासाठी कोकाटे यांना उच्च न्यायालयातून दोषसिद्धीला स्थगिती मिळवावी लागेल. तरच कोकाटे यांचे मंत्रिपद आणि आमदारकी वाचू शकेल. शिक्षा ठोठावल्यावर न्यायालयाने कोकाटे यांना जामीन मंजूर केला. आमदारकी वाचविण्यासाठी कोकाटे यांना लगेचच उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागेल. उच्च न्यायालयाने दोषसिद्धीस स्थगिती दिली तरच कोकाटे यांची आमदारकी व मंत्रिपद वाचू शकेल. न्यायालयाने दोषसिद्धीस नकार दिल्यास कोकाटे यांना मंत्रिपदाचाही राजीनामा द्यावा लागेल. तसेच शिक्षेचा कालावधी व त्यापुढे सहा वर्षे त्यांना कोणतीही निवडणूक लढविता येणार नाही.

न्यायालयात खटला दाखल झाल्यावर त्यावर सुनावणी होते. आरोपी दोषी आढळल्यास त्याला न्यायालयाकडून आधी दोषी घोषित केले जाते. मग संबंधित कलमांतील तरतुदीनुसार शिक्षा दिली जाते. दोषी ठरविणे आणि शिक्षा हे दोन वेगवेगळे प्रकार आहेत. सुनावणी न्यायालयाच्या निकालाला वरिष्ठ न्यायालयाने म्हणजे कोकाटे यांच्या प्रकरणात उच्च न्यायालयाने स्थगिती द्यावी लागेल. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली तरच कोकाटे यांची आमदारकी वाचू शकेल. संबंधित निकालातील दोषी ठरविण्याच्या प्रक्रियेस न्यायालयाने स्थगिती दिली तरच कोकाटे यांचे मंत्रिपद कायम राहू शकते.

दोन वर्षांपूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना गुजरातमधील न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावली होती. या विरोधात राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांच्या दोषीसिद्धीस स्थगिती दिली. परिणामी राहुल गांधी यांना अपात्र ठरविण्याचा निर्णय रद्द होऊन त्यांना पुन्हा खासदारकी प्राप्त झाली होती. तसेच २०२४ मधील लोकसभेची निवडणूक लढविता आली होती. लक्षद्वीपमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या तत्कालीन खासदाराला दहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आल्याने त्याची खासदारकी रद्द झाली. लोकसभा सचिवालयाने लगेचच अधिसूचना काढत ती जागा रिक्त असल्याचे जाहीर केले. निवडणूक आयोगाने लगेचच या मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर केली. पण या दरम्यान केरळ उच्च न्यायालयाने दोषी ठरविण्याच्या निकालाला स्थगिती दिली. यामुळे खासदारकी वाचली होती. गेल्या वर्षी नागपूर जिल्ह्यातील सावनेर मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांना नागपूर जिल्हा बँक घोटाळ्यात पाच वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. न्यायालयाने केदार यांना जामीन मंजूर केला. पण त्यांना दोषी ठरविण्याच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिला. परिणामी केदार यांची आमदारकी तर रद्द झालीच पण त्यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेली विधानसभेची निवडणूक लढविता आली नव्हती.

गोविंदा चाबुकस्वार



MARCH 17

# अंतराळ कन्या
## कल्पना चावला

आज १७ मार्च, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांची जयंती. २१ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या.

१९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीलपेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला.

या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे.

१. तिचा जन्म हरियाणातील करनाल येथील एका पंजाबी हिंदू कुटुंबात झाला. भारताच्या फाळणीच्या वेळी तिचे पालक पाकिस्तानातील शेखुपुरा येथून करनाल येथे स्थलांतरित झाले होते.

२. तिला विमानांबद्दलचे आकर्षण लहानपणापासूनच होते, ती स्थानिक फ्लाइंग क्लबमध्ये जायची आणि तिच्या वडिलांसोबत विमाने पाहायची.

३. तिने पंजाब अभियांत्रिकी महाविद्यालयातून एरोनॉटिकल अभियांत्रिकीमध्ये अभियांत्रिकीची पदवी मिळवली आणि तिच्या बॅचमधील ती एकटीच मुलगी होती. १९८२ मध्ये ती अमेरिकेत गेली आणि १९८४ मध्ये आर्लिंग्टन येथील टेक्सास विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकीमध्ये मास्टर ऑफ सायन्स पूर्ण केली. १९८६ मध्ये तिने दुसरे मास्टर्स केले आणि १९८८ मध्ये कोलोरॅडो बोल्डर विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकीमध्ये पीएचडी देखील केली.

४. तिने १९८८ मध्ये नॅशनल एरोनॉटिक्स स्पेस एजन्सी एम्स रिसर्च सेंटरमध्ये काम करण्यास सुरुवात केली. एप्रिल १९९१ मध्ये ती अमेरिकेची नागरिक झाली आणि १९९५ मध्ये नासा अॅस्ट्रोनॉट कॉर्प्समध्ये सामील झाली. कॉर्प्समध्ये सामील होण्यासाठी तिचा पहिला अर्ज १९९३ मध्ये नाकारण्यात आला.

५. तिच्या आयुष्यात दोनदा अंतराळात जाणारी ती पहिली भारतीय वंशाची महिला होती. तिचा पहिला प्रवास १९९७ मध्ये सहा सदस्यांच्या क्रूचा भाग म्हणून झाला होता. ती भारतीय वंशाची महिला आणि अंतराळात जाणारी दुसरी भारतीय बनली होती. तिच्या पहिल्या अंतराळ मोहिमेदरम्यान, तिने तत्कालीन भारतीय पंतप्रधान आयके गुजराल यांच्याशी बोलले होते आणि त्यांना अंतराळातून टिपलेले हिमालयाचे फोटो दाखवले होते.

६. तिची दुसरी उड्डाण STS-१०७ होती, २००३ मध्ये कोलंबिया स्पेस शटलची २८ वी आणि शेवटची उड्डाण. १६ दिवसांच्या या दुर्दैवी मोहिमेने १६ जानेवारी २००३ रोजी उड्डाण केले आणि १ फेब्रुवारी रोजी परत येणार होते. टेक्सासवरून पृथ्वीच्या वातावरणात पुन्हा प्रवेश केल्यानंतर लगेचच, अवकाश यानाचे अवतरण होण्याच्या फक्त १६ मिनिटे आधी, विघटन झाले.

७. कोलंबिया स्पेस शटल दुर्घटनेत कल्पना चावला आणि तिच्या इतर सहा क्रू सदस्यांचा मृत्यू झाला, त्यानंतर नासाने स्पेस शटल कोलंबियाचे मिशन अनेक वर्षे थांबवले. आयएसएसचे बांधकाम देखील थांबवण्यात आले आणि नासाच्या शटल उड्डाणे पुन्हा सुरू होईपर्यंत २९ महिने पुरवठ्यासाठी स्टेशन पूर्णपणे रशियन रोस्कोसमॉस स्टेट कॉर्पोरेशनवर अवलंबून होते.

८. कल्पना चावला यांना मरणोत्तर काँग्रेसनल स्पेस मेडल ऑफ ऑनरने सन्मानित करण्यात आले. त्यांना अमेरिका आणि भारत सरकारकडून मरणोत्तर अनेक पदके, पुरस्कार आणि मान्यता मिळाली.

९. कोलंबिया स्पेस शटल दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सात अंतराळवीरांच्या स्मरणार्थ नासाने मंगळावरील सात टेकड्यांचे नाव दिले. भारताच्या पहिल्या हवामान उपग्रहाचे नाव 'कल्पना १' असेही होते.

१०. फेब्रुवारी २००३ मध्ये तिचा मृत्यू होण्यापूर्वी तिचे पती जीन पियरे हॅरिसन यांच्याशी २० वर्षे लग्न झाले होते. २ डिसेंबर १९८३ रोजी वयाच्या २१ व्या वर्षी तिने लग्न केले होते. हॅरिसन यांनी पुन्हा लग्न केले आहे आणि आता त्यांना एक लहान मुलगा आहे आणि कॅलिफोर्नियातील लॉस गॅटोस येथे एक प्रकाशन कंपनी चालवतात.

पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# शिवणकाम
## महिलांसाठी उत्तम घरगुती व्यवसाय

**शिवणकाम ही एक कला आहे. पूर्वी महिला घरीच शिवणकाम करायच्या त्यामुळे घरातील मुली आणि महिलांना शिवणकाम करण्याचं ज्ञान असायचं. मात्र आजकाल शिवणकाम हे फक्त घरातील लोकांचे कपडे शिवणं अथवा फाटलेले कपडे दुरूस्त करणं इतकं मर्यादित नाही. शिवणकामातील कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण घ्यावं लागतं. यात बेसिक आणि एडवान्स असे अनेक कोर्सेस असतात. जर तुम्हाला शिवणकामात रस असेल तर तुम्ही शिवणकामाचा व्यवसाय सुरू करू शकता. महिलांसाठी खास ब्लाऊज, ड्रेसेस, बाळाचे कपडे, पुरूषांचे कपडे अशा विविध कॅटगरीमध्ये तुम्ही स्वतःचा टेलरिंगचा बिझनेस सुरू करू शकता. काही फॅब्रिक कंपन्याही तुमच्या व्यवसायाशी जोडल्या जाऊ शकतात. एवढंच नाही तर इतरांना शिवणकाम शिकवण्याचा क्लासही तुम्ही घरच्या घरी सुरू करू शकता. त्यामुळे शिवणकाम हा महिलांसाठी उत्तम असा घरी करण्यासारखा व्यवसाय आहे.**



आपल्या सर्वांना माहिती आहे की फॅशनने कसे एक प्रगत वळण घेतले आहे जिथे ते दररोज सुधारत आहे. का? कदाचित लोक त्यांच्या क्षेत्रात वेगाने सर्जनशील होत आहेत म्हणून. म्हणूनच अलिकडच्या वर्षांत टेलरिंगच्या व्यवसायात वाढ दिसून आली आहे. पण आपण त्या तेजस्वी फॅशन टेलरबद्दल बोलत नाही आहोत, तर येथे आपण आपल्या आई, वडील, शेजारी आणि टेलर दुकाने करत असलेल्या सामान्य टेलरिंगबद्दल बोलू. ज्या टेलरना त्यांच्या घरच्या आरामात शिवणकाम करायचे आहे त्यांच्यासाठी घरी टेलरिंग व्यवसाय कसा सुरू करायचा ते आपण शिकू.

आज, आपण असे बरेच लोक पाहतो ज्यांच्याकडे काही प्रकारचे कौशल्य आहे आणि ते त्यांचे काम सुरू करू इच्छितात, म्हणून ते लहान असो की मोठे, याची पर्वा न करता एक पाऊल उचलतात. शिवणकाम सुरू करणे हे अशा लोकांसाठी एक पाऊल असेल ज्यांना शिवणकाम आणि शिवणकाम आवडते. हा खरोखरच एक फायदेशीर व्यवसाय आहे. तुमच्यापैकी बरेच जण असा विचार करत असतील की जेव्हा बरेच लोक तयार कपडे खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत तेव्हा हे कसे शक्य आहे. हे खरे नाही. आपल्या समाजातील एक मोठा भाग अजूनही कपडे शिवण्यासाठी शिंपीकडे जातो. कारण त्यांना तो त्यांच्यासाठी सर्वोत्तम वाटला. तरीही, अशा काही महिला किंवा तरुणी आहेत ज्या या शिंप्यांकडून त्यांचे कपडे किंवा सूट शिवणे पसंत करतात. त्यांच्या गरजेनुसार कारणे वेगवेगळी असू शकतात.

कामाची स्वतंत्रता - जेव्हा तुम्ही घरी टेलरिंगचे दुकान उघडता तेव्हा तुम्ही तुमच्या अटींवर काम कराल. तुम्हाला कोणत्याही गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून राहण्याची गरज नाही. तुम्हाला जे काही शिवायचे आहे त्यासाठी तुम्ही तुमचे विचार निवडू शकता. तुम्ही तुमच्या सोयीनुसार गोष्टींची योजना आखू शकता.

कमी गुंतवणूक - सहसा, गुंतवणूक हे लोक व्यवसाय सुरू न करण्याचे मुख्य कारण असते. परंतु येथे तुम्हाला गुंतवणुकीची काळजी करण्याची गरज नाही कारण येथे गुंतवणूक खूप कमी आहे. विशेषतः, कमी गुंतवणुकीचे मुख्य कारण म्हणजे तुम्ही हा व्यवसाय घरी सुरु करू शकता जिथे तुम्हाला कोणताही अतिरिक्त खर्च सहन करावा लागत नाही.


तुम्हाला फक्त तुमचे शिलाई मशीन हवे आहे जे तुमच्याकडे आधीच असेल, जागा देखील असेल आणि इतर गोष्टी. घरी तुमचा व्यवसाय उघडण्याचा हाच फायदा आहे. जेव्हा तुम्हाला जास्त खर्च करावा लागत नाही, तेव्हा तुम्ही जे काही उत्पन्न मिळवता ते तुमच्या नफ्यात जाते जिथे नफा जास्त असतो. तुम्ही नफा मिळवण्याचे विविध मार्ग शोधू शकता जसे की वेगवेगळया डिझाइन वापरणे, विद्यमान कौशल्ये वाढवणे, सर्वोत्तम ग्राहक सेवा देणे, काही नियमित सवलत देणे इ. तुमचा नफा तुम्हाला मिळणाऱ्या ऑर्डरपेक्षा देखील बदलू शकतो जसे की कधीकधी तुम्हाला युनिफॉर्म शिवणकामाचा ऑर्डर किंवा वधूच्या ड्रेस शिवणकामाचा ऑर्डर इत्यादी मिळू शकतात. ऑर्डर जितकी मोठी असेल तितका नफा मार्जिन जास्त असेल.

# आतड्याचे आरोग्य तपासण्यासाठी एक मिनिटाची चाचणी

आतडे आपल्या आरोग्याच्या केंद्रस्थानी असते. आरोग्य आणि हेल्थस्पॅम सुधारण्याच्या बाबतीत आतडे बरे करणे किंवा ते बरे असणे ही पहिली पायरी असते, असे डिजिटल क्रिएटर व 'बायोहॅकर' तान्या मलिक चावला यांनी एका इन्स्टाग्राम रीलमध्ये म्हटले आहे. तर तुम्हाला ॲसिडिटीचा धोका आहे की नाही हे शोधण्यासाठी एक मिनिटाची चाचणी घेण्याचा सल्ला तान्या मलिक चावला यांनी दिला आहे. या चाचणीमध्ये रिकाम्या पोटी पाण्याबरोबर बेकिंग सोडा घेणे समाविष्ट आहे. बेकिंग सोडा पोटातील आम्लात मिसळून कार्बन डाय-ऑक्साइड (वायू) तयार करतो, ज्यामुळे ढेकर येतो. ढेकर देण्यासाठी लागणारा वेळ एखाद्या व्यक्तीच्या पोटातील आम्ल कमी आहे की नाही हे ठरवण्यासाठी वापरला जातो. व्हिडीओमध्ये, तान्या मलिक चावलाने पोटातील जास्त आम्लामुळे आम्लपित्त होते या सामान्य गैरसमजाबद्दल सांगितले आहे. तिने असा दावा केला की, पोटातील आम्ल कमी झाल्यामुळे अन्न आतड्यात पचत नाही आणि त्यामुळे किण्वन व आम्ल रिफ्लक्स होते.

तान्या मलिक चावलाच्या या दाव्याची पडताळणी करण्यासाठी, आम्ही चेन्नईच्या प्रॅगमॅटिक न्यूट्रिशन येथील मुख्य पोषण तज्ज्ञ मीनू बालाजी यांचा सल्ला घेतला. त्यांनी आम्हाला सांगितले की, पोटातील आम्ल उत्पादनाच्या मूल्यांकनासाठी ही चाचणी एक घरगुती पद्धत आहे. आपल्या पोटात हायड्रोक्लोरिक आम्ल तयार होते, जे इतर पाचक एंझाइम्ससह अन्नाचे विघटन करते. जास्त आम्ल उत्पादनामुळे अनेकांना आम्लपित्त होते म्हणूनच सामान्यतः अँटासिड्स लिहून दिली जातात. पण, पोटातील आम्लाचे प्रमाण कमी असल्याने पचन आणि पोषक घटकांचे शोषणदेखील प्रभावित होऊ शकते, ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य प्रभावित होते.

तसेच त्यांनी ही गोष्टसुद्धा निदर्शनास आणून दिली की, पोटातील आम्ल कमी किंवा जास्त, लहान आतड्यांतील जीवाणूंची अतिवृद्धी खूप लवकर खाणे किंवा जास्त हवा पोटात जाणे अशा अनेक कारणांमुळे ढेकर येऊ शकतो. म्हणूनच मीनू बालाजी यांच्या मते, ढेकर देणे हे पोटातील आम्ल पातळी ठरविण्यासाठी विश्वसनीय सूचक नाही. बेकिंग सोड्याची चाचणी विश्वसनीय आहे का? ही प्रमाणित निदान चाचणी नाही. पचनाच्या समस्या असलेले काही लोक जेवणापूर्वीच ढेकर देतात, ज्यामुळे ढेकर देणे हे बेकिंग सोड्यामुळे आहे की आधीपासून असलेल्या आजारांमुळे आहे हे ठरवणे कठीण होते. मीनू बालाजी यांनी सांगितले की, पोटातील आम्ल पातळी व्यक्तीपरत्वे बदलते आणि दिवसभर कमी-जास्तसुद्धा होते, ज्यामुळे केवळ ढेकर देण्याच्या आधारे निष्कर्ष काढणे आणखीन कठीण होऊ शकते किंवा असू शकते. पोटातील आम्ल पातळी निश्चित करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे तुमच्या लक्षणांबद्दल डॉक्टरांचा सल्ला घेणे. अचूक मूल्यांकनासाठी डॉक्टर, 'हायडेलबर्ग पीएच टेस्ट' यांसारख्या चाचण्यांची शिफारस करू शकतात, असे त्यांनी सांगितले आहे.



**सोमवार**
**१७ मार्च २०२५**

**मेष**
संभ्रमाची स्थिती संपेल. आज तुम्हाला काही कामातून मोठा फायदा होणार आहे.

**वृषभ**
पूर्ण कामे पूर्ण होतील. खर्चात वाढ झाल्याने बचत करणे कठीण होईल. आज भाग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल.

**मिथुन**
नुकसान होण्यापासून संरक्षण होईल दिवस आनंद देणारा आहे. अर्धवट कामे आज पूर्ण होतील.

**कर्क**
वैवाहिक जीवनात परस्पर समन्वय राहील. चुकांमधून शिकून तुम्हाला पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल.

**सिंह**
दिवस तुम्हाला सकारात्मक परिणाम देईल. आज तुमचा संयम ठेवा आणि वेळेनुसार वाटचाल करा.

**कन्या**
तुमचा जोडीदार आज काहीतरी करेल ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. व्यवसायात अनपेक्षित लाभ

**तूळ**
आज काही गोष्टी समोर येतील ज्या भविष्यात फायदेशीर ठरतील. काही नवीन काम सुरू करणे लाभदायक

**वृश्चिक**
योजनेवर काम केल्यास तुमची सर्व नियोजित कामे पूर्ण होतील. गुंतवणूक करण्यापूर्वी संशोधन करा.

**धनु**
स्वतःवर विश्वास ठेवा दिवस चांगला जाईल. व्यावसायिकांनी व्यवसायनियोजन करावे.

**मकर**
आज प्रगतीचे नवीन मार्ग सापडतील. गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील, सावध

**कुम्भ**
राहा. भावनांवर नियंत्रण ठेवा, फायदा होईल. मित्र नवीन भेटवस्तू घेऊन येतील. चुकांमधून शिकता

**मीन**
येईल. व्यवसायात तुमची व्यस्तता वाढेल. तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा सामान्य असेल.


# कबरीवरून तापलेलं राजकारण

छावा नावाचा चित्रपट १४ फेब्रुवारीला देशभरात प्रदर्शित झाला. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात औरंगजेब चर्चेत आहे. समाजवादी पक्षाचे नेते आणि आमदार अबू आझमी यांनीही औरंगजेब हा उत्तम शासक होता असं म्हटलं होतं. त्यानंतरही बराच वाद निर्माण झाला. दरम्यान भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर उखडून टाका अशी मागणी केली होती. त्यानंतर मागच्या ९ दिवसांत काय घडलं जाणून घेऊ.



### उदयनराजे काय म्हणाले होते?

"औरंगजेब हा धर्मांध, क्रूर शासक आणि या देशाचा लुटारू होता. छत्रपती शिवाजी महाराजांना त्रास देणाऱ्या, छत्रपती संभाजी महाराजांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करणाऱ्या या औरंगजेबाच्या कबरीचे या महाराष्ट्रात उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत हे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायमचे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच उखडून टाकली पाहिजे." यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचंही वक्तव्य समोर आलं.



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस औरंगजेबाच्या कबरीबाबत काय म्हणाले?

उदयनराजेंच्या वक्तव्याबाबत विचारलं असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आम्हालाही असंच वाटतं की कबर उखडून टाकावी. पण काही गोष्टी कायद्याने कराव्या लागतात. ती कबर संरक्षित आहे. काँग्रेसच्या काळात त्या कबरीला एएसआयचं संरक्षण मिळालं आहे." गुरु तेग बहाद्दूर यांच्या ३५० व्या शहीद वर्षाच्या निमित्ताने मुख्यमंत्री बोलत होते. त्यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. दरम्यान हा मुद्दा संसदेतही गाजला.



### शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के काय म्हणाले?

औरंगजेबाने अत्यंत क्रूर पद्धतीने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली. तसंच हिंदू मंदिरंही पाडली. या मंदिरांमधली संपत्ती लुटली. तसंच शिखांच्या नवव्या आणि दहाव्या धर्मगुरुंची हत्या केली. याच औरंगजेबाची कबर पुरातत्व खात्याने खुलताबाद या ठिकाणी संरक्षित केली आहे. ही कबर संरक्षित करण्याची गरज काय? असा सवाल नरेश म्हस्केंनी केला आहे. तसंच औरंगजेबच नाही तर भारताविरोधात काम करणाऱ्या सगळ्यांचीच स्मारकं आणि कबरी नष्ट कराव्यात अशी मागणी केली आहे.



### जितेंद्र आव्हाड विरुद्ध नरेश म्हस्के

जितेंद्र आव्हाड म्हणाले, "आपल्याकडे रोज औरंगजेब जिवंत होतो. कधी विधानसभेत, कधी कणकवलीत. सरकारच्या योजना काय? मल्हार सर्टिफिकेट, झटका-हलाल प्रमाणपत्र आणि धार्मिक घोषणा. आपलं सरकार औरंगजेब, भोंगे, हलाल-झटका यावर घाम गाळतं. माझा प्रश्न असा आहे महाराष्ट्राचा राज्यकारभार कोण चालवतो? राज्यकर्ते की धार्मिक एजंट? तसंच अफझल खानाला बाजूला करुन प्रतापगडाची लढाई सांगता येईल का? हिटलरला बाजूला करुन दुसरं महायुद्ध सांगता येईल का?" असेही प्रश्न आव्हाड यांनी उपस्थित केले. तर त्यांना उत्तर देताना नरेश म्हस्केंनी त्यांचा उल्लेख जितू मियाँ आव्हाड असा केला. नरेश म्हस्के म्हणाले, ज्यांना औरंगजेब यांची कबर ठेवायची असेल त्यांनी औरंगजेब त्यांचा देव आहे हे मान्य करावं.

### सरकार काय भूमिका घेणार हे पाहणं महत्त्वाचं

**मागच्या नऊ दिवसांमध्ये या विविध प्रतिक्रिया औरंगजेब आणि त्याची कबर उखडण्याची मागणी झाल्यापासून उमटल्या आहेत. दरम्यान मंत्री नितेश राणेंनीही औरंगजेबाची कबर उखडावी असं म्हटलं आहे. तर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारने याबाबत काय तो निर्णय घ्यावा असं म्हटलं आहे. तसंच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही औरंगजेबाच्या कबरीचा वाद, झटका, हलाल मटण या सगळ्या गोष्टी बंद करा. या ड्रामामध्ये कुणालाही इंटरेस्ट नाही असं म्हटलं आहे. राज्यातले कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न जास्त महत्त्वाचे आहेत असंही त्यांनी म्हटलं आहे. आता औरंगजेबाच्या कबरीचा हा वाद नेमका कुठल्या वळणावर जाणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.**



### संजय राऊत यांनी काय म्हटलं आहे?

शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत या विषयावर म्हणाले, औरंगजेबाच्या कबरीवर बोलताय, इथे तीन हजार शेतकऱ्यांच्या चिता जळाल्या आहेत त्यावर बोला. त्यावर कुणालाही संवेदना नाहीत. तीन हजार शेतकऱ्यांना काय औरंगजेबाने कबरीतून उठून आत्महत्या करायला लावली का? बेरोजगार मुलांच्या डोक्यात धर्मांधता भरवून त्यांना दंगलखोर बनवलं जातं आहे. काश्मीरमधला तरुण दंगलखोर झाला कारण त्यांच्या हाताला काम नव्हतं. आज महाराष्ट्रातही मला काश्मीरसारखी परिस्थिती दिसते आहे. असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

### विश्व हिंदू परिषदेचा इशारा काय?

**महाराष्ट्रातून औरंगजेबाची कबर हटवण्यात यावी अशी मागणी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद यांनी केली आहे. तसंच औरंगजेबाची कबर न हटवल्यास कारसेवा करुन बाबरी प्रमाणे ती कबर हटवली जाईल असाही इशारा विहिंपने दिला आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी ही कबर इथून हटवू नये अशी मागणी केली आहे. त्यांच्यावर पुन्हा एकदा नरेश म्हस्केंनी टीका केली आहे.**

## केडीएमटी परिवहन व्यवस्थापकांच्या हस्ते महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाद्वारे महिला दिनाचे औचित्य साधून गणेश घाट आगार येथे उपक्रमातील महिला कर्मचाऱ्यांचा डॉ.विजयकुमार द्वासे, परिवहन व्यवस्थापक यांच्या हस्ते यथोचित सन्मान करुन महिला दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी उपक्रमातील कंत्राटी महिला वाहक, सुरक्षा रक्षक, सफाई कामगार, शिपाई, लिपिक या संवर्गातील महिला कर्मचाऱ्यांचा भेट वस्तू देवून सन्मान करण्यात आला. परिवहन व्यवस्थापक डॉ.विजयकुमार द्वासे,यांच्यासह लेखाधिकारी जितेंद्र सोनवणे,आगार व्यवस्थापक किशोर घाडी, कार्यालय अधिक्षक प्रिया निगडे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी कर्मचारी या सोहळयास उपस्थित होते.

एएसआरटीयु या वाहतुक क्षेत्रातील शिखर संस्थेने महिला दिनी आयोजित केलेल्या महिला वाहक कर्मचाऱ्यांच्या सत्कार सोहळयामध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रमातील महिला वाहक कर्मचारी सविता आव्हाड यांची उपस्थिती, मार्गावरील उत्पन्न व वाहक पदावरील सेवा या मध्ये बजावलेली अव्वल कामगिरी या निकषानुसार त्यांचा नवी दिल्ली येथे सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आलेला आहे. परिवहन उपक्रमामध्ये साजऱ्या झालेल्या महिला दिनी सविता आव्हाड यांचाही सत्कार करण्यात आला.

महिला दिन सोहळयामध्ये उपस्थित महिलांनी आपले मनोगत सादर केले. या मध्ये प्रामुख्याने उपक्रमात प्रथमच अशा प्रकारे महिलांचा सन्मान सोहळा आयोजित झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त करून परिवहन व्यवस्थापकांचे मनापासून आभार मानले. परिवहन व्यवस्थापक डॉ.विजयकुमार द्वासे, यांनी त्यांच्या भाषणात कर्मचारी प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका राहील तसेच योग्य मागण्यांची निश्चित दाखल घेतली जाईल असे सांगत कर्मचारी वर्गास दिलासा दिला.

# इंस्टाग्राम –फेसबुकला डोंबिवलीतील तरुणांचे ऍपद्वारे आव्हान

## आमदार रवींद्र चव्हाण यांच्याकडून डोंबिवलीतील तरूणांचे कौतुक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : भारताबाहेरील ऍप दैनदिन जीवनाचा भाग बनले आहे. मात्र या ॲपच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाची माहिती संपूर्ण डाटा थेट जागतिक स्तरावर पोहोचतो. अतिशय महत्त्वपूर्ण माहितीचा हा संग्रह भारताबाहेर जाण्याचा ओघ रोखण्यासाठी आता डोंबिवलीकर तरुणांनी पुढाकार घेतला आहे. कपिल अगरवाल या तरुणाने आपल्या दोन मित्रांच्या मदतीने ट्रिफी टेक्नोलॉजी नावाची कंपनी तयार करून या कंपनीच्या माध्यमातून इंस्टाग्राम आणि फेसबुक यासारख्या ऍप ला आव्हान देणारे i -ai नावाचे ऍप बाजारात आणले आहे. आज या तरुणाच्या भरारीचे डोंबिवलीचे आमदार रवींद्र चव्हाण यांनी कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

वेगवेगळ्या सोशल प्लॅटफॉर्म च्या माध्यमातून जग जितके जवळ येत आहे तितकेच आपली वैयक्तिक माहिती जगाच्या कानाकोपऱ्यात अज्ञातांकडे पोहोचत आहे. देशातील हा महत्त्वाचा डाटा देशात सुरक्षित रहावा या उद्देशानेच डोंबिवलीकर तरुनाणी इंस्टाग्राम फेसबुक ला पर्यायी ॲप ची निर्मिती केली आहे. देशभरातील इंजिनियर्सना एका छत्राखाली आणून या तरुणांनी हे शिवधनुष्य पेलले असून, रिल्स व्हिडिओ शेअर करण्याच्या सुविधेबरोबरच व्हाट्सअप च्या चॅटिंगची सुविधा देखील यात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तर हॉटस्टार या एअर चॅनेल बरोबर देखील हे ॲप जोडलेले असल्याने वापरकर्त्याला एकाच ॲप द्वारे सोशल मीडियाशी जोडून राहता येणार आहे. अल्पावधीतच हे ॲप देशभरातील तरुणाईच्या पसंतीस उतरल्याचे कपिल अगरवाल यांनी सांगितले. आज या तरुणांच्या डोंबिवलीतील कार्यालयाला आमदार रवींद्र चव्हाण यांनी भेट देत त्यांना शुभेच्छा दिल्या.




ज्येष्ठ अभिनेते अरुण कदम यांनी साजरा केला धुलीवंदनाचा सण आपल्या परिवार व मित्रांसोबत सोबत अनेक कलाकार



## देहूनगरीत बीजसोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पिंपरी** : जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या नामगजराने रविवारी देहूनगरी दुमदुमली. भजनी दिंड्यांनी रात्रभर केलेला जागर, काकडा आरती, महापूजा, हरिपाठ अन् वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ अशा भक्तिमय वातावरणात रविवारी ३७५ वा बीज सोहळा झाला. दुपारी बारा वाजता नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे फाल्गुन कृष्ण द्वितीयेचाय दिवशी सदेह वैकुंठगमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचा तुकाराम महाराजांचा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला. देहूनगरीत या दिव्य सोहळयासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले होते

## महाराष्ट्राचे कृषीक्षेत्र पन्नासहून अधिक टक्क्यांनी घटले ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातील शेतकरी शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात रस्त्यावर उतरले असतानाच राज्यात शेतीचे क्षेत्रफळ झपाट्याने कमी होत असल्याची चिंताजनक माहिती आहे. अख्ख्या भारतात शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ ६ लाख ४२ हजार हेक्टरने कमी झाले आहे. यात महाराष्ट्रातील ३ लाख २५ हजार हेक्टर शेतीचा समावेश आहे. अर्थात पन्नास टक्क्यांहून अधिक कृषी क्षेत्र एकट्या महाराष्ट्रात कमी झाले.

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी ब्रिजेंद्रसिंग ओला यांना लोकसभेत दिलेल्या एका लेखी प्रश्नाच्या उत्तरातून ही माहिती पुढे आली आहे. या माहितीनुसार, देशात शेतजमीन व पेरणीचे क्षेत्रफळ या दोन्ही गोष्टींचा आकार झपाट्याने घटत चालला आहे. सरकारने पाच वर्षाच्या कालावधीतील शेतजमिनीच्या उपयोगाबाबतचा अद्ययावत अहवाल जारी केला.

यातील आकडेवारीनुसार, २०१८-१९ मध्ये भारतात १८ कोटी ६ लाख २४ हजार हेक्टर जमीन शेतीयोग्य होती. मात्र, २०२२-२३ मध्ये शेतजमिनीचे क्षेत्रफळ कमी होऊन १७ कोटी ९९ लाख ८२ हजार हेक्टरपर्यंत खाली आले. या पाच वर्षांत देशातील ६ लाख ४२ हजार हेक्टर शेतीचे क्षेत्रफळ घटले.

ही आहेत कारणे...

- राष्ट्रीय महामार्ग, राज्याचे रस्ते आणि रेल्वे लाईन यासारख्या पायाभूत सोयी-सुविधांच्या विकासासोबतच शहरीकरण आणि औद्योगिकीकरणासाठी कृषी जमिनीचा वापर होणे, देशातील शेतीचे क्षेत्र घटण्यामागचे प्रमुख कारण होय.
- २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत देश पातळीवर शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ कमी झाले असले तरी मध्य प्रदेश, छत्तीसगड, हरयाणा, ओडिशा, अरुणाचल प्रदेश, आसाम, हिमाचल प्रदेशासह १० राज्यांत हे प्रमाण वाढले आहे. राज्यातील शेत जमिनीची प्रमुख आकडेवारी १.६४ कोटी हेक्टर - जमिनीवर राज्यात यंदा लागवड झाली.
- ५२ लाख हेक्टरवर - कापूस ५० लाख हेक्टरवर - सोयाबीन ३.७ कोटी हेक्टर - राज्याचे एकूण क्षेत्रफळ १.६५ कोटी हेक्टर - जमीन शेती लागवडीखाली वनक्षेत्र - ९% बिगर शेती - १२% लागवडीखाली नसलेली - ८% पडीक जमीन - ९%

## कंत्राटी वीज कमगारांचे आंदोलन मे अखेरपर्यंत स्थगित



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महावितरण, महानिर्मिती व महापारेषण वीज कंपनीतील मंजूर नियमित रिक्त पदावर व गरजेनुसार कार्यरत असलेल्या शोषित व पीडित वीज कंत्राटी कामगारांचे विविध कंत्राटदारां कडून होणाऱ्या आर्थिक सामाजिक व मानसिक शोषणाच्या प्रत्येक तक्रारीची दखल वीज कंपनी प्रशासनाने गांभीर्याने घेतलीच पाहिजे व कंत्राटी कामगाराला न्याय मिळाला पाहिजे या भूमिकेतून महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाने मंगळवार दिनांक 18 मार्च रोजी विधान भवनासमोर भव्यमोर्चा काढण्याचे ठरवले होते.

दि.6 मार्च रोजी महावितरण कंपनीचे कार्यकारी संचालक मानव संसाधन परेश भागवत तसेच मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके आणि दि.13 मार्च रोजी अपर प्रधान सचिव ऊर्जा आभा शुक्ला यांच्या उपस्थितीमध्ये संघटना प्रतिनिधी यांची एक मीटिंग मंत्रालयात झाली. या मीटिंग मध्ये संघटनेने दिलेल्या पत्रातील समस्या सोडवण्याच्या दृष्टिकोनातून वीज कंपनी प्रशासनाने विविध सकारात्मक पावले उचलली असल्याचे प्रधान सचिव आभा शुक्ला यांनी सांगितले.


संघटनेने पत्राद्वारे मांडलेल्या वीज कंत्राटी कामगारांच्या सर्व प्रलंबित समस्या शासन व वीज कंपनी प्रशासनाच्या वतीने लवकरच येत्या काळात पूर्ण करण्यात येतील. दोषी कंत्राटदारांवर योग्य व कठोर कारवाई केली जाईल. कंत्राटदार विरहित कंत्राटी कामगार पद्धती साठीचा हरियाणा पॅटर्न तसेच राज्यातील कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन विषयी प्रलंबित असलेली वेतन वाढ हा विषय तसेच वीज उद्योगासाठी किमान वेतनाची स्वतंत्र श्रेणी निर्माण करणे इत्यादी धोरणात्मक विषयासाठी शासनाच्या विविध अंगाशी संघटना व आपण एकत्रित संवाद साधून आगामी काळात या समस्या नक्कीच सोडवू

असे आभा शुक्ला व परेश भागवत कार्यकारी संचालक महावितरण यांनी आश्वासित केले.

त्यामुळे संघटनेच्या सर्व केंद्रीय प्रमुख पदाधिकारी तसेच 36 जिल्ह्यातील सर्व जिल्हाध्यक्ष व सचिव यांनी विधानसभेवरील भव्य मोर्चा तात्पुरता स्थगित करून शासन व प्रशासनाकडून प्रलंबित समस्यां लवकरात लवकर सोडवून घेण्यासाठी होकार दर्शवला व सध्या तात्पुरते हे आंदोलन 31 मे पर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेतला असल्याचे अध्यक्ष निलेश खरात यांनी कळवले.

## सरकारी विधि अधिकाऱ्यांमध्ये तीस टक्के महिला आवश्यक

### सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती नागरत्ना



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : ग्रामपंचायतींमधील महिलांसाठीच्या आरक्षणाचे कौतुक करताना केंद्र आणि राज्य सरकारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विधि अधिकाऱ्यांमध्ये किमान ३० टक्के महिला असणे आवश्यक आहे, असे मत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी शनिवारी व्यक्त केले. उच्च न्यायालयातील महिला न्यायमूर्तींची संख्या वाढवण्यावर भर देताना त्यादृष्टीने सक्षम महिला वकिलांची नियुक्ती करण्याचे आवाहनही नागरत्ना यांनी यावेळी केले.

पंचेचाळीस वर्षांखालील पुरुष वकिलांना उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्त केले जाऊ शकते, तर सक्षम महिला वकिलांना का नाही, असा प्रश्नही न्यायमूर्ती नागरत्ना यांनी यावेळी उपस्थित केला. मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या 'ब्रेकिंग ग्लास सीलिंग: विमेन हू मेड इट' या विषयावरील चर्चासत्रात न्यायमूर्ती नागरत्ना यांनी उपरोक्त मत मांडले. लिंगभेदाची भिंत यशस्वीरीत्या तोडण्यासाठी भावी मुली आणि महिलांना पुराणमतवादाच्या विचारांत अडकवले जाऊ नये.

किंबहुना, पुरूषांप्रमाणे महिलाही यश मिळवण्यासाठी सक्षम असतात. केवळ, तरुण महिलांना प्रेरणा, प्रोत्साहन आणि कायदेशीर व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मदत करणारे आदर्श आणि मार्गदर्शक नसतात. परंतु, पुराणमतवादी भिंत तोडणाऱ्या आणि आपला मार्ग शोधून त्यावर चालणाऱ्या महिलांचे महत्त्व ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचवेळी, अनेकांच्या जीवनावर प्रभाव असलेल्या मात्र प्रसिद्धीझोतापासून दूर असलेल्या महिलांनाही विसरू नये, असे न्यायमूर्ती नागरत्ना यांनी स्पष्ट केले.

माता, पत्नी आणि काळजीवाहू म्हणून भूमिका बजावणाऱ्या सामान्य महिलांचे जीवन देखील ओळखले पाहिजे. त्यांचे महत्त्व नेहमीच दिसून येत नाही, परंतु अनेक माध्यमातून या महिला त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना बाहेरील जग जिंकण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. मुलांचे संगोपन आणि घर सांभाळण्यासाठी देखील नेतृत्व, बौद्धिक क्षमता आणि सर्जनशीलतेची खूप आवश्यकता असल्याचे नागरत्ना यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखीत केले.

## कल्याणमधील सेंट्रल रेल्वे शाळेत विद्यार्थ्याला दोन शिक्षिकांकडून मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - मध्य रेल्वेतील वरिष्ठांबरोबर असलेल्या प्रशासकीय कामातील वादातून कल्याण पश्चिमेतील सेंट्रल रेल्वे शाळेत शिक्षण घेत असलेल्या आपल्या आठ वर्षाच्या मुलाला मारहाण होत असल्याची तक्रार विद्यार्थ्याच्या वडिलांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात केली आहे. याप्रकरणी दोन शिक्षिकांविरुध्द शनिवारी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी विद्यार्थ्याच्या पालकांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडेही तक्रार केली आहे. या विभागातील अधिकाऱ्यांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

मारहाण झालेल्या अल्पवयीन विद्यार्थ्याचे वडील विनोद धुरंधर हे कुटुंबीयांसह उल्हासनगर येथे राहतात. ते मध्य रेल्वेमध्ये वरिष्ठ विभागीय अभियंता (टेलिकॉम) आहेत. ते रेल्वेच्या कल्याण कार्यालयात काम करतात. त्यांचा आठ वर्षाचा मुलगा सेंट्रल रेल्वे शाळेत शिक्षण घेत आहे. विनोद धुरंदर यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की मध्य रेल्वेचे वरिष्ठ कार्मिक अधिकारी हे सेंट्रल रेल्वे शाळेचे अध्यक्ष असतात.

चार वर्षापूर्वी शाळेचे वरिष्ठ अधिकारी आणि अध्यक्ष यांनी आपल्या कार्यालयीन चक्राकार गैरहजेरीत गैरप्रकार करून आपले वेतन बंद केले. याप्रकरणी आपण राष्ट्रीय अनुचित जाती जमाती आयोगाकडे तक्रार केली होती. ही तक्रार मागे घ्यावी म्हणून शाळेचे दोन्ही वरिष्ठ आपल्यावर दबाव टाकत होते. आपण तक्रार मागे घेतली नाही. या प्रकरणात आपणास न्याय मिळाला.

सेंट्रल रेल्वे शाळेत आपले वरिष्ठ डॉ. ए. के. सिन्हा यांनी सध्याच्या प्राचार्य ज्योती श्रीवास्तव यांची नियुक्ती केली आहे. त्या काही ना कारणाने आपणास त्रास देण्याचा प्रयत्न करतात. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये सेंट्रल रेल्वे शाळेतील आपल्या आठ वर्षाच्या मुलाला रोहिणी तिवारी नावाच्या शिक्षिकेने मारहाण केली होती. आम्ही त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यानंतर ऑक्टोबरमध्येही रोहिणी शिक्षिकेने आपल्या मुलाच्या डोक्यावर हाताने मारले. केस ओढून, कानाला धरून त्याला बाकड्यातून खेचून शिक्षा म्हणून जमिनीवर बसवले होते. याप्रकरणी आपण राष्ट्रीय बाल हक्क आयोगाकडे तक्रार केली होती. प्राचार्य श्रीवास्तव यांच्याकडे तक्रार केली होती. त्यांनी याप्रकरणी दिलगिरी व्यक्त केली होती. १ मार्च रोजी प्रज्ञा कदम या शिक्षिकेने आपल्या अल्पवयीन मुलाला हाताच्या चापटीने पाठीवर मारहाण केली. त्यावेळी कदम यांना जाब विचारल्यावर त्यांनी मारण्याचे कारण न सांगता याप्रकरणात आपली दिलगिरी व्यक्त केली होती.

## भारतीय ज्ञान प्रणाली अंतर्गत अंतर्विद्या व बहुविद्याशाखीय चर्चासत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी



**कल्याण** : अनेक प्राचीन भारतीय ऋषींना आणि विद्वानांनी कित्येक शतकांपूर्वी प्रचंड प्रमाणात ज्ञाननिर्मिती करून ठेवली आहे. मौखिक परंपरा, हस्तलिखिते, पारंपरिक पद्धती, शिलालेख अशा विविध माध्यमांमध्ये ही निर्मिती करण्यात आली. मात्र, या परंपरेत खंड पडल्याने ती माहिती आजच्या पिढीपर्यंत पोहोचू शकली नाही. स्थापत्यशास्त्र, गणित, कृषी, पर्यावरण, खगोलशास्त्र अशा अनेक विषयांमध्ये हे ज्ञान उपलब्ध आहे. शालेय धड्यांपासून ते उच्चशिक्षणापर्यंत विविध पातळ्यांवर आता हे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले जाणार आहे हे ज्ञान पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार इंडियन नॉलेज सिस्टीमबद्दल शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या पद्धतीमागील तत्त्वज्ञान, प्राथमिक शब्दसंपदा आणि संदर्भ शिक्षकांपर्यंत पोहोचविण्याचे काम येत्या काळात केले जाणार असल्याचे विचार डॉक्टर किशोरी भगत डीन डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स मुंबई यांनी व्यक्त केले. शेठ हिराचंद मुथा महाविद्यालय कल्याण यांच्या कला आणि वाणिज्य शाखे तर्फे आयोजित भारतीय ज्ञान प्रणाली अंतर्गत अंतर्विद्या व बहुविद्याशाखीय दृष्टिकोनावर आधारित राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये त्या बोलत होत्या.

यावेळी डॉक्टर श्रीकांत चव्हाण, बसवा कल्याण कॉलेज कर्नाटक चे हेड ऑफ डिपार्टमेंट इंग्लिश, डॉक्टर माधवी निकम मुंबई अकॅडमी कौन्सिल मेंबर, बीएनएन महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉक्टर सुधीर निकम ,बिर्ला महाविद्यालयाच्या डॉक्टर मधु शुक्रे, ज्ञानसाधना महाविद्यालयाचे ग्रंथ पाल डॉक्टर महेश दळवी, आनंद विश्व गुरुकुल कॉलेजचे एडवोकेट प्रधान, टिळक कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर बेटी मुखर्जी, मुथा महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रकाश मुथा, महाविद्यालयाच्या प्राचार्य अनुजा ब्रह्म, आयक्यूएससी प्रमुख दीपशिखा जैन उपस्थित होत्या.

भारतीय ज्ञान प्रणाली बद्दल एक प्रथा असण्याऐवजी, ही एक संघटित प्रणाली आणि ज्ञान हस्तांतरणाची एक पद्धत आहे. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद आणि उपवेद हे भारतीय ज्ञानव्यवस्थेचा पाया रचतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, किंवा एनइपी-2020, कालातीत भारतीय ज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या समृद्ध वारशाचा मार्गदर्शक आधार घेते असते अशी विविध विचार यावेळी मान्यवरांतर्फे व्यक्त करण्यात आले. या परिषदेत एकूण 15 प्राध्यापकांनी आपले रिसर्च पेपर सादर केले.

### जाहिर नोटीस

या नोटिसीद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की मुरबाड नगरपंचायत हद्दीतील संभाजीनगर येथिल मालमत्ता क्रमांक 705 ही मालमत्ता श्री भिला उर्फ भालचंद्र पुंजाराम भुजारी यांच्या नावे मुरबाड नगरपंचायत दप्तरी नोंद आहे. परंतु सदर मालमत्ता आता मी माझा भाऊ वसंत पुंजाराम भुजारी यांच्या नावे मुरबाड नगरपंचायत दप्तरी नोंद करावयाचे आहे.

तरी सदर मिळकतीस या व्यतिरिक्त अन्य कोणाला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी आजपासून म्हणजे नोटिस निघाल्या पासून ७ दिवसांच्या आत मा.नगरपंचायत, मुरबाड येथे हरकत घ्यावी. तद्नंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

महाराष्ट्र नगर पंचायत/नगरपरिषद औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 130 अन्वये सदर मिळकत वरिल प्रमाणे माझे व माझे वारसंचे नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- आपला
भिला उर्फ भालचंद्र पुंजाराम भुजारी

## वृक्षतोड झालेला परिसर वन विभागाला हस्तांतरित करा

### पर्यावरणप्रेमींची वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : महापालिका मुख्यालयाच्या समोरील व एनआरआय पोलीस ठाण्याच्या शेजारील नेरुळ सेक्टर ५२ ए हा परिसर सीआरझेड अंतर्गत येत असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खारफुटी आहे. त्यामुळे हे संपूर्ण क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करायला हवे. परंतु असे न करता सिडकोने या परिसरात असलेली झाडे तोडल्याने संबंधित सिडको अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी माजी नगरसेविका शिर्के व पर्यावरणप्रेमींनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली आहे. शिर्के आणि पर्यावरणप्रेमींनी नाईक यांची मंत्रालयात भेट घेऊन ही मागणी केली. नेरुळ सेक्टर ५२ ए परिसरात जवळजवळ २०० पेक्षा अधिक झाडे तोडल्याचा प्रकार सोमवारी उघडकीस आल्यानंतर याबाबत पर्यावरणप्रेमींनी आक्रमक पवित्रा घेत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती. त्यानंतर मंगळवारी नेत्रा शिर्के यांच्या पुढाकाराने पर्यावरणप्रेमींनी नाईक यांची भेट घेऊन हा प्रकार निदर्शनास आणून दिला. पर्यावरणप्रे सुनील तसेच श्रुती अग्रवाल तसेच वन विभाग आणि कांदळवन विभागाचे दीपक खाडे यावेळी उपस्थित होते.

नेरुळ सेक्टर ५२ अ हा परिसर सीआरझेड अंतर्गत येत असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खारफुटी आणि दाट जंगल आहे. याच परिसरात डीपीएस तलाव असून या ठिकाणी फ्लेमिंगोंचा मोठ्या प्रमाणात रहिवास असतो. फ्लेमिंगोंसह दुर्मीळ सोनेरी कोल्हा तसेच मुंगूस आदी प्राण्यांचे येथे वास्तव्य आहे. दरम्यान, वनमंत्री गणेश नाईक बुधवारी सिडको व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष यांची भेट घेणार आहेत. त्यावेळी डीपीएस तलाव ते जेट्टी परिसर वनविभागाकडे हस्तांतरित करण्याची मागणी करणार आहेत.

दैनिक जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार ४

■ 17 मार्च 2025

jeevandeepvartanews2020@gmail.com

# टोरेस'च्या सील केलेल्या दालनात चोरीचा प्रयत्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गावदेवी परिसरातील 'टोरेस'च्या सील केलेल्या शोरूममध्ये चोरीचा प्रयत्न झाल्याचा प्रकार घडला आहे. टोरेस प्रकरणात तपास करणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेने गावदेवीमधील संबधीत शोरूम ७ मार्च २०२५ ला सील केले होते. चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी गावदेवी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या शोरूमच्या शेजारचे दुकानही अनोळखी चोरट्याने फोडले आहे. याप्रकरणी पोलीस सीसीटीव्हीच्या मदतीने तपास करत आहेत. आर्थिक गुन्हे शाखेतील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीधर शंकर राव भोईटे (५६) यांनी तक्रार केली आहे. तक्रारीनुसार, ते आणि त्यांची पथक, पोलीस निरीक्षक रमेश यादव यांच्यासोबत, शुक्रवारी सकाळी १० वाजता सील केलेल्या शोरूमजवळ गेले. तेथे पोहोचल्यावर शोरूमला लावलेली सील तोडून लोखंडी शटर उघडलेले दिसले. भोईटे यांनी त्वरित आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. या शोरूमच्या शेजारी असलेल्या दुचाकीचे शटरचे टाळेही फोडण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणी सराईत आरोपीचा सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आहे. टोरेस गैरव्यवहारात मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मीरा-भाईंदर या भागांतील हजारो गुंतवणूकदारांचे या प्रकरणात कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. हा संपूर्ण कट युक्रेन देशातील नागरिक असलेल्या मुख्य आरोपीने रचला होता.

# पत्रकार सुनिल लोणकर यांचे कार्य कौतुकास्पद - खासदार निलेश लंके

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



सामाजिक कार्यकर्ते म्हणून कार्यरत असलेले लोणी मावळा येथील पत्रकार सुनिल लोणकर यांचे कार्य कौतुकास्पद असून त्यांचा तालुक्याला अभिमान असल्याचे गौरवोद्गार खा . डॉ . निलेश लंके यांनी काढले आहेत .

पारनेर तालुक्यात सामाजिक क्षेत्रात प्रसिद्ध असलेले लोणी मावळा येथील सुनिल लोणकर यांची नुकतीच "बुलंद पोलीस टाईम्स "या आघाडी च्या वृत्तपत्रासाठी पारनेर तालुका प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल खा . डॉ . निलेश लंके यांच्या हंगा येथील कार्यालयात शाल , पुष्प गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला . यावेळी खा . डॉ . लंके पुढे म्हणाले की , सामाजिक क्षेत्रात काम करून प्रश्न सोडवत असताना कार्यकर्त्यां ना शासकीय कार्यालयात अडचणी येतात . पण त्याला पत्रकारितेची जोड दिल्यास सर्वसामान्यांचे खितपत पडलेल्या प्रश्नांना वृत्तपत्रांच्या माध्यमातून उजेडात आणून ते सोडविण्यास मदत होते . "बुलंद पोलीस टाईम्स " हे राज्यात नावाजलेले वृत्तपत्र असून या वृत्तपत्रासाठी सुनिल लोणकर यांची पारनेर तालुका प्रतिनिधी म्हणून झालेली निवड सार्थ असल्याचे गौरवोद्गार ही खा . डॉ . लंके यांनी काढले . पत्रकार सुनिल लोणकर यांनी खा . डॉ . लंके यांनी केलेल्या सन्माना बद्दल ऋण व्यक्त केले . यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते .

# निलेश सांबरेंच्या वाढदिवसा निमित्त घागुर्ली येथे स्वच्छता अभियान!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●




**मुरबाड-प्रतिनिधी**

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा कर्मवीर निलेश भगवान सांबरे यांच्या 17 एप्रिल रोजी साजरा होणार्या वाढदिवसा निमित्ताने संपूर्ण कोकणात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. ठाणे, पालघर,रायगड, मुंबईसह कोकणात शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, महिला सक्षमीकरण या पंचसुत्रीला धरून कोणत्याही राजकीय वरदहस्ता शिवाय काम करत आहेत. स्पर्धा परीक्षांची मोफत वाचनालये व अकॅडमी सुरु करून तरूणांनी अधिकारी झाले पाहिजेत हि महत्वकांक्षा ठेऊन त्यांच्या जिजाऊ संघटनेचे काम सुरु आहे. याबद्दल अनेक राजकीय क्षेत्रातिल,सामाजिक क्षेत्रातील लोकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना गौरविले आहे. मुरबाड तालुक्यातील भालूक, टेमगाव, ब्राह्मणगाव व घागुर्लि सारख्या छोटेसे गाव असणाऱ्या महिलांनी आप्पांना ग्राम स्वच्छतेची अनोखि भेट दिली असून सर्व महिला एकत्र येत गावातील घरासमोरील अंगणे, रस्ते, चौक चकाचक करून वेगळा आदर्श समोर ठेवला आहे.

# सरळगावातील दुकानाला भीषण आग तरुणाच्या धाडसाने टळला अनर्थ

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**मुरबाड दि.१६** - मुरबाड - कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या सरळगाव येथील एका दुकानाला लागलेल्या आगीत पेटत असलेला सिलेंडर एका तरुणाने धाडस दाखवून बाजूला केल्यामुळे मोठी होळीच्या दिवशी दुर्घटना टळली.

या दुकानासमोरच दोन मोटरसायकल उभ्या होत्या त्या बाजूला काढण्यात आल्या व लोकांनी ही आग विझवली सरळगाव नाक्यावर असलेल्या बंटी सासे यांच्या चायनीज दुकानात काही पदार्थ बनवत असताना गुरुवारी १३ मार्च रोजी अचानक कढईतील पदार्थाने पेट घेतला व दुकानाच्या वरील भागात आग पसरली होती या दुकानात असलेल्या गॅस सिलेंडरने सुद्धा पेट घेतला होता त्यामुळे एकच घबराट उडाली या परिसरात असलेल्या एका तरुणाने पेटत असलेला गॅस सिलेंडर ओढून बाहेर काढला व त्याला लागलेली आग विझवली त्यामुळे सुदैवाने मोठी दुर्घटना घडली नाही.

# रायते -पिंपळोली ग्रामपंचायतने राबविला अनाथ बालकांसाठी पुरणपोळीचा उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड दि.१६ :** होळीचा सण संपूर्ण भारत देशात मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जातो पण गोरगरीब अनाथ निराधार बालक या सणापासून वंचित राहिले जातात त्यामुळे अशा बालकांची होळी गोड व्हावी तसेच त्यांना सुद्धा पुरणपोळीचा आस्वाद घेता यावा हा एक सामाजिक उपक्रम तसेच खेळ पैठणीचातसेच क्रिकेटच्या स्पर्धा वेगवेगळे होळी शिमगोत्सवात खेळले जाणारे खेळ असे वेगवेगळे सामाजिक उपक्रम रायते 'गावाच्या सरपंच समिता सुरोशी व उपसरपंच मयूर सुरोशी 'यांच्या माध्यमातून आणि संकल्पनेतूनरायते ग्रामस्थ व गुप ग्रामपंचायत रायते यांच्याकडून शिमगोत्सवानिमित आयोजित करण्यात आला होता. यामध्ये गावातील अनेक महिला, पुरुष ,बालक, युवक विविधक्षेनातील मान्यवर राजकीयव पक्षाचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या उत्साहाने अनाथ बालकांसाठी पुरणपोळया जमा करताना दिसत होते रायते गावातून जमा झालेल्या पुरणपोळया या जीवन संवर्धन फाउंडेशन म्हस्कळ व समतोल फाउंडेशन मामनोली येथील अनाथ आश्रमात वाटप करण्यात आल्या. तसेच सरपंच सौ समिता सुरोशी व उपसरपंच मयूर सुरोशी यांच्या संकल्पनेतून खेळ पैठणीचा हा कार्यक्रम मोठ्या दिमाखाने साजरा केला. यामध्ये जवळपास ४०० महिलांनी भाग घेतला यामध्ये प्रथम क्रमांक नमता सुरोशी, द्वितीय उज्वला कोर ,तृतीय सुरणी सुरोशी या पैठणीच्या मानाच्या मानकरी ठरल्या. तसेच के.जी. स्पोर्ट्स रायते व शिवशाही स्पोर्ट्स यांच्या माध्यमातून क्रिकेटच्या स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या यामध्ये 'जवळजवळ २५० युवकांनी भाग 'घेतला होता. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद व स्मित हास्य पाहून गावातील नागरिकांना एक वेगळाच अनुभव पहावयास मिळाला या कार्यक्रमासाठी रायते गावच्या सरपंच समिता सुरोशी उपसरपंच मयूर सुरोशी,माजी सरपच संतोष सुरोशी, राम सुरोशी,श्रीकांत तारमळे, देवदास सुरोशी नारायण सुरोशी, भालचद्र सुरौशी, मनोज सुरोशी ,दिलीप तारमळे, मिलिंद चंदने, नरेश 'तारमळे,साईनाथ ठाकरे सचिन सुरोशी.निलेशसुरोशीकेतन सुरोशी,तानाजी ठकरे, बाळाराम तारमळे ,भास्कर मगर ,गावातील महिला पुरुष युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित दर्शवली.

# मुरबाडमध्ये 'तुकाराम बिज ' भक्तीभावात साजरी!




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी**

महाराष्ट्रात वारकरी सांप्रदायाचा कळस चढवणारे,आपल्या अभंग वाणिने समाजात नवचैतन्य निर्माण करणारे ,भक्तिचा आणि शक्तिचा संगम घडवून आणणारे थोर संत जगद्गुरु तुकाराम महाराजांचे सदेह वैकुंठागमन म्हणजेच तुकाराम बिज महाराष्ट्रात वारकरी सांप्रदाय मोठ्या भक्ती भावाने साजरी करत असतात.अवघ्या 42 वर्षाच्या आयुष्यामध्ये तुकारामांनी त्यावेळी समाज प्रबोधनाचे महान कार्य केले.आजही त्यांची गाथा घराघरा पुजली जाते.अशा या महान संताचे महापरिनिर्वाण म्हणजेच सदेह वैकुंठागमन तुकाराम बिज मुरबाड मध्ये दरवर्षी साजरी केली जाते. यावर्षी मुरबाड तालुका कुणबी समाज महिला मंडळाच्या वतीने कुणबी भवन येथे साजरी करण्यात आली. यावेळी संत तुकाराम महाराजांच्या पुतळ्याची यथोचित पुजा करून त्यांचे मनोभावे दर्शन घेण्यात आले.

या कार्यक्रमासाठी मुरबाड तालुका कुणबी समाज संघटनेचे अध्यक्ष गणपत विशे, तालुका उपाध्यक्षा ज्योतीताई गोडांबे, महिला तालुका अध्यक्षा भाग्यश्री जाधव, माजी तालुका अध्यक्षा छायाताई चौधरी, कल्पना घोलप,संध्या कदम, अर्चना विशे, संगिता साबळे, सुवर्णा गायकर यांच्यासह मोठ्या संख्येने महिला मंडळाच्या सदस्या उपस्थित होत्या.

# खारेपाट विभाग सुजलाम सुफलाम होईल का?- सी.आर. म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



महाराष्ट्रात जास्तीत जास्त पाण्यासाठी आंदोलने झालीत ती फक्त आणि फक्त खारेपाट विभागात.लोकसभेपूर्वी खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून स्मरणात राहणारी दोन उपोषणे झाली.मात्र या उपोषणात लोकांचा आणि मायभगिनींचा तर मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. शासनाला वाहिलेली श्रद्धांजली असो वा गाढवाचं लग्न असो.याची दखल शासन स्तरावर घेतली गेली.विरोधी पक्षाचे लोक प्रतिनिधी यांनी शासनाला उपोषण सोडण्यात भाग पाडले,उपोषण करताना विधान परिषदेत,विधान सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी लेखी,तोंडी आश्वासन दिले होते.आणि त्यावेळी उपोषण स्थळी खासदार तटकरे यांनी भेट देऊन उपोषण कर्त्यांना प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांशी संपर्क करून दिला आणि उपोषण यशस्वी करण्यास मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल विभाग आभारी आहे.आणि मग आचार संहिता लागण्या अगोदर प्रत्यक्ष ७६६ कोटी मंजुरीचे पत्र ऑनलाईन सर्व प्रसार माध्यमाद्वारे जग जाहीर केले. एव्हढेच नव्हे तर दयानंद भगत यांच्याद्वारे खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या कार्यकर्त्यांना वाशी ग्रुप ग्रामपंचायत येथे हातात सुपूर्त केले ही धमक साहेबांनी दाखवून दिली.मात्र हेटवणे मध्यम प्रकल्प चतुर्थ सुप्रमा मंजुरी नंतर १५/१०/२०२४ सदर कामाचे टेंडर उघडण्यात आले मात्र अजून पर्यंत कार्यारंभ आदेश होत नाही का हा मोठा यक्ष प्रश्न आहे.११ मार्च रोजी हेटवणे धरणावर खारेपाट संघटनेच्या माध्यमातून जलसमाधी आंदोलन झाले.मोठा पोलिस बंदोबस्त असल्यामुळे पुढील अनर्थ टळला अशेच म्हणावे लागेल.

आमच्या मनात एक प्रश्न पडतो की आमचे सर्वात ज्येष्ठ आमदार रवींद्र पाटील यांचे मंत्रालयात एक वेगळे स्थान आहे.शब्दाला वजन आहे.मी स्वतः मंत्रालयात साहेबांची एक बैठक पाहिली आहे,त्यामुळे त्यांनी मनावर घेतले की कामाची सुरुवात होईल यात तिळमात्र शंका नाही पण त्यांना एखादी अदृष्य शक्ती कार्यारंभाचा आदेश देण्यापासून वंचित तर करत नाही ना ? या शंकेला वाव आहे.वास्तविक खारे पाट विभागातील ७/१२ वर सिंचनाचा शिक्का आहे.त्यामुळे हेटवणे धरणाच्या पाण्यावर आमचा पहिला हक्क आहेच. मग परस्पर MMRDA साठी आग्रह का? सिडको तहान भागविण्यासाठी जल बोगदा.ही काय अवस्थाआज आमचे शेतकरी प्रायोगिक तत्वावर तलावातील पाण्यातून भातशेती ,काकडी, कोबी,फुलकोबी,विविध प्रकारची फुले पिकवित आहेत.आमची शेती सुपीक आहे.तिला जर पर्यायी पीक घेता आले तर सुपीकता वाढेल पण हेच शासन करते, यांच्या लक्षात येत नाही हे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

१९९८ मध्ये हेटवणे धरणाची निर्मिती याच विभागासाठी झाली पण साधे पाणी मिळत नाही.भोगावती नदी तीरावर पाणी वाहते.पहा मग कोणाच्या वाट्याला दोष जाईल ते दबक्या आवाजात सांगितले जाते की या पंचायती पाण्याची मागणी करत नाहीत तसे ठराव नाहीत.काय गंमत पहा सिंचनाचे शिक्के मरणारे हेच आणि पाण्याची गरज नाही म्हणणारे हेच. म्हणजे प्रश्न पडतो कोण? आज केंद्रात,राज्यात जिल्ह्यात,तालुक्यात,नव्हे गावात कमळ फुलले आहे.फक्त शेतात कमळ फुलायचे आहे ते पण शक्य होईल कधी तर कार्यारंभाचा आदेशझाल्यावर..

सिंचनाचे पाणी आल्यावर तलाव भरलेले रहातील मासे शेतीला सुगीचे दिवस येतील, पाणी विपुल मिळाले की खेड्याकडे चला म्हणायची वेळ येणार नाही. आपोआप लोक खेड्याकडे वळतील.आजोळ काय ते नवीन पिढीला समजेल.

आज खारेपाट विभागात बंदिस्ती रस्ते,इतर विकास कामांचा शुभारंभ झाला आहे..मात्र ही कामे करणाऱ्या कंत्राट दाराने,राजा छत्रपती शिवरायांनी केलेल्या कामांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.त्यांची किल्ल्याची स्थिती कित्तेक वर्षांपूर्वी ची साक्ष देतात.

आपल्या कामात मात्र आर्थिक गळती होत आहे.महाराष्ट्रात काही उदाहरणे पहा अगणित संपत्ती या मार्गाने मिळणारे कैदेत सडतात.अती हाव कामाची नसते.लोकांसाठी शासनाच्या योजना असतात मात्र त्या योग्य पद्धतीने राबवल्या जात नाहीत.ही एक योजनांना लागलेली मानव निर्मित किड आहे.

सेझ संघर्ष लोप पावतोय का?त्याचा आवाज येत नाही का? आवाज करून देत नाहीका?MMRDA कधीही रौद्र रूप कधी धारण करेल सांगता येत नाही.एकदा का नोटीसा हातात आल्या की धावाधाव करायला वेळ देणार नाहीत.म्हणूनच तक्रार करून सुद्धा रीतसर सुनावणी घेत नाहीत.सेझ हटवताना जनमत चाचणी सेझला कोपली आहे.त्यामुळे लोकांना गृहित धरून MMRDAभूत डोईवर बसवतील.हा ड्रीम प्रोजेक्ट आहे त्यामुळे कित्येक अदृष्य शक्ती यामध्ये हात धुवून घेतील.हा प्रोजेक्ट खूप छान आहे हा प्रचार सुरू केला आहे यात शंका नाही कारण कोणीही राग व्यक्त करताना दिसत नाही.जेव्हा हातात एक सापिका न देता जमीन हातातून हिसकावून घेतील तेव्हाच शेतकऱ्यांचे डोळे उघडतील तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.म्हणून खारेपाटातील जनतेने वेळीच सावध व्हा असा सल्ला ही सी.आर.म्हात्रे यांनी दिला आहे.

आज या विभागात विरोध करणारी सक्षम ताकद दिसत नाही.विरोधात धैर्यशील पाटील होते तेव्हा तो बुलंद,अभ्यासू आवाज होता तोच आवाज आज विरोधात नाही.आणि त्याची फौज पण बाजूला झाली.आहे... आज विरार..अलिबाग कॉरिडॉर याच्या दुतर्फा जमीन खरेदी होत आहे असे समजते म्हणजे तिसरी महामुंबई साठीचे टोकाचे प्रयत्न आहेत.जर टोकाचा विरोध झाला नाहीतर लोक भुई सपाट होतील. आज खारघर,नवी मुंबई .नवीन पनवेल,उरण येथे आपली आगरी कोळी समाज बांधव संस्कृती बिल्डिंग मध्ये स्थित झालीत.तशीच आपली अवस्था होईल.म्हणून पक्ष बाजूला ठेऊन समाजासाठी तरी एकत्र यायला पाहिजे.आज पेण मध्ये दुकानदार आपले नाहीतच,रस्त्यावरची जनता ७० टक्के बाहेरची,jsw ८० टक्के परराज्यातील,अरवली मध्येतर आपला स्थानिक विरळाच.एकंदरीत खारेपाट विभागातील सत्ताधारी, विरोधकांनी एकत्र या नाहीतर,सर्वच भूमिहीन होतील.आणि आपल्याच भातासाठी रांगेत उभे रहावे लागेल.मोजके अब्जाधीश होतील आणि बाकीचे देशोधडीला लागतील.यासाठी तरुण वर्गाने MMRDA प्रोजेक्ट काय आहे याचा अभ्यास करा. आणि समाजाप्रती प्रेम दाखवा अशी आर्त हाक सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी दिली आहे.

# केडीएमसीच्या नागरिक सुविधा केंद्रातील असुविधा दूर करण्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** केडीएमसी च्या "अ" प्रभाग क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या टिटवाळा येथे नागरिकांच्या सुविधेसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने नागरिक सुविधा केंद्र चालू करण्यात आले आहे. मात्र "अ" प्रभागक्षेत्रातील या नागरिक सुविधा केंद्रात सध्या नागरीकांबरोबरच समस्यांचीही रांग लागल्याचे पहायला मिळत आहे .

येथील नागरिक सुविधा केंद्रात दररोज ४०० ते ५०० नागरिक कर भरणा आणि पाणी बिल भरण्यासाठी येत असतात. मात्र या ठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ही अपुरी असल्याने येथे येणाऱ्या नागरिकांना तासनतास या ठिकाणी रांगेत उभे राहावे लागते. त्याचबरोबर या ठिकाणी इन्व्हर्टरची सुविधा नसल्याने वारंवार खंडीत होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे या ठिकाणी कर भरणा करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या वेळेचा अपव्यय होतो. ज्येष्ठ, वृद्ध नागरिक , दिव्यांग व्यक्तींना अश्यावेळी नाहक त्रासाला सामोरे जावे लागते.

या ठिकाणी असलेल्या स्वच्छता गृहाची देखील दुरावस्था झाली असून येथे दुर्गंधी आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यामुळे डासांचा देखील प्रादुर्भाव वाढल्याचे पाह्यला मिळत आहे . ठीकठिकाणी ड्रेनेज पाईप लाईन फुटल्याने त्यातील दुर्गंधीयुक्त सांडपाणी आजूबाजूच्या परिसरात पसरलेले असते. या ठिकाणी कुठलीही साफसफाई केली जात नाही.

हे नागरिक सुविधा केंद्र नसून असुविधा केंद्र असल्याची टीका माजी उपमहापौर बुधाराम सरनोबत यांनी केली आहे. तसेच आपण याबाबत कल्याण डोंबिवली महापलिकेच्या कर उप आयुक्त स्वाती देशपांडे यांच्याशी देखील याबाबत अनेकदा बोलूनही अद्याप येथे सुधारणा झालेली नसल्याची सरनोबत यांनी सांगितले.

"याबाबत उप आयुक्त देशपांडे यांच्याशी संपर्क साधला असता,त्यांनी सांगितले की, संदर्भीत सुविधा केंन्द्रात एक कर्मचारी काम पाहत असून आणखी एक कर्मचारी उपलब्ध करणार असून इन्व्हर्टरच्या सुविधे बाबत तातडीने व्यवस्था मार्गी लावणार असल्याचे सांगितले."

# बीडवरून गांजा तस्करी
## बाजारपेठ पोलिसांनी ठोकल्या बेड्या



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण बाजारपेठ पोलिसांनी गांजा तस्कराला सापळा रचत बेड्या ठोकल्या आहेत. शकील शेख असे या गांजा तस्कराचं नाव आहे. त्याच्याकडून 12 किलो 436 ग्राम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला असून शकील हा बीडचा राहिवासी आहे. त्याने गांजा बीड हुन आणला होता . हा गांजा कुणाला विकण्यासाठी आणला होता व कुठून आणला होता याचा तपास पोलीस करीत आहे.

कल्याण सहाय्यक पोलीस आयुक्तांचे पथक कल्याण मध्ये गस्त घालत असताना पोलीस हवालदार प्रल्हाद चौधरी यांना बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेतीबंदर परिसरात मोकळ्या जागेत एक इसम गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीनुसार कल्याण बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब दुकळे, पोलीस अधिकारी प्रशांत आंधळे यांच्यासह बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने या परिसरात सापळा रचला व या ठिकाणाहून संशयितरित्या फिरत असलेल्या शकील शेख या तरुणाला ताब्यात घेतलं. त्याची झडती घेतली असता बारा किलो 436 ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. शकील शेख हा मूळचा बीडचा रहिवासी आहे तो बीडमध्ये शेतीचे काम करत असल्याची माहिती तपासा दरम्यान समोर आली आहे. त्याने हा गांजा बीड मधून आणला होता मात्र कल्याण मध्ये तो कोणाला विकण्यासाठी आला होता याचा तपास पोलीस करीत आहेत.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com